**<u>वादीतर्फे साक्षीदार क्र. २ दादासो यांचा शपथेवर सरतपास विधिज्ञ श्री.आर.व्ही.रावराणे यांच्या मार्फत</u>**

४. मी माझे पुराव्याचे शपथपत्र निशाणी क्र.८५ प्रमाणे दाखल केले आहे. सदर शपथपत्र माझे वकिल साहेब यांनी मी दिलेल्या माहितीप्रमाणे तयार केले असून ते मला वाचून दाखविले. त्यातील मजकूर संपुर्णपणे बरोबर असून त्यावर मी माझ्या सहया केलेल्या आहेत.

५. कुंदा रामजी गुप्ता हिने करुन दिलेले मृत्यूपत्र मला दाखवण्यात आले. त्यावर साक्षीदार म्हणून माझी सही आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. त्यावर कुंदा रामजी गुप्ता हिच्या अंगठ्याचा ठसा आहे. माझ्यासोबत दुसरा साक्षीदार होता. त्याने मृत्यूपत्रावर सही केली होती. त्याने केलेली सही मला दाखवली. ती तीच अाहे. मृत्यूपत्रासोबत कुंदा गुप्ता हिचे वैद्यकीय प्रमाणपत्र जोडलेले होते. ते मृत्यूपत्रासोबत आहे. सदरचे मृत्यूपत्र **<u>नि.क्र.९१</u>** प्रमाणे आहे.

सरतपास पुर्ण.

**<u>प्रतिवादी क्र. १ ते ३ यांचे तर्फे उलट तपास विधिज्ञ श्री.यु.एस.सावंत यांचेमार्फत सुरु.</u>**

६. माझे शिक्षण मांडरे, ता.करवीर येथे बारावी पर्यंत झाले आहे. मांडरे येथे माझे घर आहे. माझे घर मेन रोडला आहे. सदरचे घर माझे चुलते बळवंत गणपती पाटील यांच्या नावे आहे. मांडरे गावची लोकसंख्या तीन हजार आहे. मी आधार कार्ड काढलेले आहे. ते मी सोबत आणले आहे. मी तपासून पाहिले असता, आधारकार्ड माझ्यासोबत नाही.

७. हे म्हणणे खरे नाही की, यमाबाई आनंदा पाटील माझी बहिण आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या वडिलांचे संपूर्ण नाव श्रीपती संतू पाटील असे आहे. हे म्हणणे खरे नाही की,

गाव मौजे पाटणे, ता.शाहूवाडी येथे माझी सामाईक मिळकत आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझे वडिल श्रीपती संतू पाटील हे दि.२६/०९/१९९८ रोजी मयत झाले आहेत. हे म्हणणे खरे नाही की, वादी बाबासो श्रीपती पाटील हा माझा सख्खा भाऊ आहे. माझ्या म्हणण्याप्रमाणे माझ्या वडिलांचे पूर्ण नाव श्रीपती गणपती पाटील असे आहे. माझ्या वडिलांचे पूर्ण नाव श्रीपती गणपती पाटील आहे असे दाखवण्याकरीता माझ्याकडे आता मतदान ओळखपत्र आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या मतदान ओळखपत्रात माझ्या वडिलांचे नाव श्रीपती पाटील असे नमूद आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या वडिलांचे नाव श्रीपती गणपती पाटील असे असल्याबाबत आता माझ्याकडे कोणताही पुरावा नाही.

८. माझ्या ट्रॅक्टरचा नोंदणी क्र.एमजीआय–६५ असा आहे. सदर ट्रॅक्टरचा मालकी हक्क माझा असल्याबाबत माझ्याकडे कोणतेही कागदपत्र नाही. मी कणकवली येथे कोणाच्या घरात भाड्याने राहत होतो हे मला आठवत नाही. सदर घराचे भाडे काय होते व डिपॉझिट किती होते हे मला आठवत नाही. सदर घराचा भाडेकरार माझ्याकडे नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी कणकवली येथे भाड्याने राहत होतो हे दाखवणारा कोणताही पुरावा माझ्याकडे नाही. माझ्या म्हणण्याप्रमाणे मी चार ते पाच वर्षापर्यंत २०१३–२०१६ पर्यंत भाड्याने कणकवली येथे राहत होतो. हे म्हणणे खरे आहे की, कणकवली येथे ट्रॅक्टर चा व्यवसाय करणा–या लोकांची संघटना आहे. हे म्हणणे खरे आहे की, फक्त सदर संघटनेचे सभासद च कणकवली येथे ट्रॅक्टरचा व्यवसाय करु शकतात. हे म्हणणे खरे आहे की, मी ट्रॅक्टर व्यवसाय संघटनेचा कधीही सभासद नव्हतो. हे म्हणणे खरे नाही की, मी २०१५ साली भाड्याने कणकवली येथे राहत होतो व ट्रॅक्टरचा व्यवसाय करत होतो हे मी खोटे सांगितले आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या पुराव्याच्या शपथपत्रातील माझ्या कणकवली येथील वास्तव्याचा व व्यवसायाचा मजकूर खोटा आहे.

९. मी राजन रामजी गुप्ता याला २०१४ पासुन २०१६ पर्यंत ४ वर्षे ओळखत होतो. राजन रामजी गुप्ता हा लिहता वाचता येणारा इसम होता. त्याच्या उत्पन्नाचे साधन मोलमजुरी हे होते. हे म्हणणे खरे आहे की, राजन रामजी गुप्ता याच्या कुटुंबाची आर्थिक परीस्थिती जेमतेम अशा स्वरुपाची होती. हे म्हणणे खरे आहे की, राजन रामजी गुप्ता याचे आई वडिल दोघेही वयोवृध्द होते. राजन गुप्ता याचे वडिल त्याचेसोबत मोलमजूरी करत होते. राजन गुप्ता यांचे वडिल शरीरयष्टीने धडधाकट होते. हे म्हणणे खरे आहे की, राजन गुप्ता याची आई वयोमानाप्रमाणे आजारपणात असायची.

१०. मी मराठा समाजाचा आहे. माझ्या गावाकडे मांडरे येथे माझ्या जमिनीचे खाते आहे. त्याचा खाते क्र.११९ आहे. सदर खाते उता–यावर माझ्यासह इतर चार लोकांची नावे नमूद आहेत. सदर खाते उतारा मी हजर करु शकतो. सध्या मी ट्रॅक्टरचा व्यवसाय मांडरे येथे करतो. आता सुध्दा माझ्याकडे पुर्वीचा या पुर्वी नमुद केलेला ट्रॅक्टर आहे. मी बाजीराव पांडुरंग पाटील यांना ओळखतो. ते मांडरे येथील आहेत. कथित मृत्यूपत्राच्या अनुषंगाने माझी बाजीराव पांडुरंग पाटील व बळवंत गणपती पाटील यांच्याशी भेट होण्याचा प्रसंग आला नव्हता.

११. मी ज्या दस्ताबाबत साक्ष देण्यास आलो आहे तो दस्त कुठे तयार केला होता हे मला आठवत नाही. तो दस्त किती पानांचा होता हे मला आठवत नाही. सदर दस्तात दुरुस्ती करण्याचा प्रसंग आला नव्हता. सदर दस्तात टायपिंग केल्याशिवाय पेनाने हाताने लिहण्याचा प्रसंग आला नव्हता. मी सदर दस्तावर कोणत्या उद्देशाने सही केली होती हे मी सांगू शकत नाही. सदर दस्तात दस्त करुन देणार हिने साक्षीदारांसमक्ष सही केली आहे असे नमुद होते. कुंदा हिने माझ्यासमक्ष सही केली होती. साक्षीदार पुन्हा सांगतो की, कुंदा हिने डाव्या हाताचा अंगठा केला होता. मी कुंदा हिचे वैद्यकीय प्रमाणपत्र पाहिले होते. हे म्हणणे खरे नाही की, सदर

वैद्यकीय प्रमाणपत्रात कुंदा हि मधुमेह, उच्च रक्तदाब व हायपर पॅरालिसीस याने ग्रस्त असल्याचे नमुद होते. आता मला मृत्यूपत्र नि.क्र.९१ सोबत असलेले वैद्यकीय प्रमाणपत्र दाखवण्यात आले. हे म्हणणे खरे नाही की, सदरचे प्रमाणपत्र कुंदा हिचे नाही. दि.१३/१०/२०१५ रोजी कुंदा या माझ्या संपर्कात सकाळी १०.०० वाजता आल्या होत्या. त्या माझ्यासोबत दुपारी तीन ते चार वाजेपर्यंत होत्या. त्यानंतर मी दुपारी चार वाजता कणकवली येथे माझ्या कामाला निघून गेलो होतो. हे म्हणणे खरे आहे की, दरम्यानच्या कालावधीमध्ये कुंदा सतत माझ्यासोबत होती. त्या दरम्यानच्या कालावधीमध्ये कुंदा यांना इतर कुठेही जाण्याचा प्रसंग आला नव्हता. मी दुपारी चार वाजता वैभववाडी येथील दुय्यम निबंधक कार्यालयातून कणकवली येथे जाण्याकरीता बाहेर पडलो होतो. माझ्यासोबत कुंदा ह्या बाहेर पडल्या नव्हत्या. त्यावेळी कुंदा हिचे सोबत तीचे पती व मुलगा होते. माझ्या म्हणण्याप्रमाणे मी कणकवली येथून माझ्या मोटरसायकलने आलो होतो. कुंदा ह्या कणकवली येथून कशाने आल्या होत्या हे मला माहिती नाही. मी कुंदा यांना वैभववाडी येथील स्टॅण्डवर सकाळी १०.३० चे दरम्याने एकत्र भेटलो होतो.

१२. हे म्हणणे खरे आहे की, कथित मृत्यूपत्रानंतर केवळ २० दिवसांनी कुंदा ही सिव्हील हॉस्पीटल येथे मयत झाली आहे. कुंदा हिच्या मृत्यूचे कारण अर्धांगवायूचा झटका असे होते किंवा कसे हे मला माहिती नाही. कुंदा हिच्या मृत्यूनंतर मला तीच्या कुटुंबियांना भेटण्याचा प्रसंग आलेला नाही. कुंदा हिचे कुटुंबिय आज माझ्या संपर्कात नाहीत. मला वैभववाडी येथे येण्याकरीता राजन याने सांगितले होते. त्याने मला तेरा तारखेच्या दोन दिवस अगोदर सांगितले होते. त्यावेळी मला दस्त पाहण्याचा प्रसंग आला नाही.

१३. हे म्हणणे खरे नाही की, मला तेरा तारखेला राजन व त्याच्या आई वडिलांनी मृत्यूपत्रावर साक्षीदार म्हणून हजर राहण्याकरीता बोलवले होते, कुंदा हिचे माहेरचे लोक तीला

त्रास देत होते त्यामुळे ती भाड्याने राहत होती, तील मृत्यूपत्र करावयाचे होते, तीचे पती मोलमजुरी करत होते, मी दि.१३/१०/२०१५ रोजी कुंदा हिच्यासोबत वैभववाडी येथील दुय्यम निबंधक कार्यालयात गेलो होतो, त्यावेळी सदानंद बाळू सुतार हा हजर होता, कुंदाच्या विनंतीवरुन तो आला होता, कुंदाने मृत्यूपत्र टाईप करुन आणलेले होते, त्यापुर्वी तीने डॉक्टरांकडे तपासणी केली होती, तीने वैद्यकीय दाखला घेतला होता, मृत्यूपत्रावर कुंदा हिने तीच्या डाव्या हाताचा अंगठा उठवला होता, त्यानंतर, मी व सदानंद यांनी साक्षीदार म्हणून मृत्यूपत्रावर सह्या केल्या होत्या हे मी खोटे सांगितले आहे. हे म्हणणे खरे नाही की, कुंदा हिच्या डाव्या हाताच्या अंगठ्याची निशाणी उठवताना आम्ही दोन्ही साक्षीदारांनी तीला पाहिले होते, मृत्यूपत्राचे वाचन करुन कुंदा हिने मृत्यूपत्र कबुल केले होते व ते मृत्यूपत्र नोंदणीकृत केले होते हे मी खोटे सांगितले आहे.

१४. हे म्हणणे खरे नाही की, वादी माझे सख्खे भाऊ आहेत. हे म्हणणे खरे नाही की, माझी व वादीची एकत्रात सामाईक मिळकत आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्यासमक्ष मृत्यूपत्र नि.क्र.९१ झाल्याचे व कुंदा हिने स्वखुशीने करुन दिल्याचे मी खोटे सांगितले आहे. हे म्हणणे खरे नाही की, वादी माझा भाऊ असल्यामुळे त्याच्या सांगण्यावरुन मी खोटी साक्ष देत आहे.

उलट तपास पुर्ण.
फेरतपास नाही.

''माझे समक्ष''
सही/-
(टी.एच. शेख)
न्यायाधिकारी,
ग्रामन्यायालय, वैभववाडी
दिनांकः २२/११/२०२३

श्रवणोत्तर स्वीकृत
सही/-
(टी.एच. शेख)
न्यायाधिकारी,
ग्रामन्यायालय, वैभववाडी